## MAHARASHTRA ACT No. IX OF 1971

## THE HYDERABAD CINEMA SHOWS TAX (MAHARASHTRA REPEAL) ACT, 1970

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २१ जानेवारी १९७१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. IX OF 1971

## AN ACT TO REPEAL THE HYDERABAD CINEMA SHOWS TAX ACT, 1952

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २८ जानेवारी १९७१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

### सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९

### हैद्राबाद चित्रपट-खेळ कर अधिनियम, १९५२ रद्द करण्यासाठी अधिनियम

—ज्याअर्थी महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रातील चित्रपट-खेळांवर कर लादण्याची तरतूद करणारा हैद्राबाद चित्रपट-खेळ कर अधिनियम, १९५२ रद्द करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गण-राज्याच्या एकविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, हैद्राबाद चित्रपट-खेळ कर (महाराष्ट्र निरसन) अधिनियम, १९७० असे म्हणता येईल ; संक्षिप्त नाव.

२. हैद्राबाद चित्रपट-खेळ कर अधिनियम, १९५२ (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे. सन १९५२ चा हैद्राबाद अधिनियम सव्वीस रद्द करणे.

३. (१) उक्त अधिनियम रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अधिनियम आणि तदन्वये किंवा तदनुसार केलेले नियम आणि अधिसूचना, उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेला कर बसविणे, तो आकारणे आणि त्याची वसुली यांच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियम रद्द करण्यापूर्वीच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधातील उक्त अधिनियमाखालील कोणत्याही शास्तीच्या प्रयोजनार्थ आणि उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांशी संबंधित असलेल्या किंवा आनुषंगिक असलेल्या कोणत्याही इतर प्रयोजनासाठी, अमलात असण्याचे चालू राहील. व्यावृत्ति.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधास बाध न आणता आणि त्यास अधीन राहून, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम ७ हे, उक्त अधिनियम हा महाराष्ट्र अधिनियमाद्वारे रद्द केलेला अधिनियम असल्याप्रमाणे, उक्त अधिनियम रद्द करण्या-संबंधात लागू होईल.

(यथार्थ अनुवाद)
के. मा. आराध्ये,
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.